# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ८४ वी बैठक दिनांक ०३ जून २०१४

## ठराव

मा. ना. शशिकांत शिंदे, मंत्री, जलसंपदा (महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ८४ वी बैठक मंगळवार दि. ०३ जून २०१४ रोजी विधानभवनातील दालन क्र. ०४३, तळ मजला विधानभवन, मुंबई येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य, विशेष निमंत्रित, सदस्यांचे प्रतिनिधी व निमंत्रित उपस्थित होते.

**सन्माननीय सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. शशिकांत शिंदे | ... | मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष |
| २. | मा. श्री. वल्लभ बेनके | ... | विसस व उपाध्यक्ष |
| ३. | मा. श्रीमती मालिनी शंकर | ... | प्रधान सचिव (जसंव्य व लाक्षेवि) व सदस्य |
| ४. | इंजि. शि.मा. उपासे | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इं. अ. वा. सुर्वे | ... | मुख्य अभियंता (जसं), पुणे |
| २. | इं. अ. वा. सुर्वे | ... | मुख्य अभियंता (विप्र), पुणे (अ.का.) |
| ३. | श्री. म. गे. टेळे | ... | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महामंडळ (अ.का.) |

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ८४ वी बैठक दिनांक ०३ जून २०१४

## ठराव

**ठराव क्र. ८४/१**

**"दि. २२/०१/२०१४ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ८२ व्या बैठकीत पारित केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने या विषयाचे नियामक मंडळाने अवलोकन केले आहे."**

**ठराव क्र. ८४/२**

**"ठराव करण्यात येतो की, दि. २८/०२/२०१४ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ८३ व्या बैठकीत पारित करण्यात आलेले ठराव खालीलप्रमाणे कायम करण्यात येत आहेत."**

*ठराव क्र. ८३/१*

*"दि.२१/११/२०१३ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ८१ व्या बैठकीत पारित केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने या विषयाबाबत कोणातही ठराव पारित करण्यात आला नाही."*

*ठराव क्रमांक ८३/२*

*"ठराव करण्यात येतो की, दि. २२/०१/२०१४ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ८२ व्या बैठकीत पारित करण्यात आलेले ठराव कायम करण्यात येत आहेत."*

*ठराव क्र. ८३/३*

*"ठराव करण्यात येतो की, महामंडळांतर्गत प्रलंबित न्यायालयीन प्रकरणांबाबतची जून २००८ पूर्वीची व जून २००८ नंतरची प्रकरणे या विषयीची मंडळवार माहिती यांचे नियामक मंडळाने अवलोकन केले अधीक्षक अभियंता, कृष्णा कोयना उपसा सिंचन योजना मंडळाकडील ६२ व अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे यांच्याकडील प्रलंबित प्रकरणांची सविस्तर माहिती नियामक मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करावी."*

*ठराव क्र. ८३/४*

*"ठराव करण्यात येतो की, सन २०११-१२ या वर्षाचा महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या लेखापरीक्षणानंतर महालेखापाल, मुंबई यांनी दि.२३.१०.१३ नुसार निर्गमित केलेला सुधारीत अलग लेखापरीक्षण अहवाल, या विषयी मुद्दा क्र. ४.६ चे अनुपालनाबाबत बैठकीत दिलेल्या सूचना लक्षात घेऊन त्याचे सुधारित अनुपालन तयार करुन त्यासह विधानमंडळासमोर सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."*

*ठराव क्र. ८३/५*

*"ठराव करण्यात येतो की,मौजे सोनकिरे, ता. कडेगाव या गावाच्या नळपाणी पुरवठा योजनेसाठी महामंडळाच्या ताब्यातील चिंचणी ल. पा. तलावाच्या बुडीत क्षेत्रातील गट क्र. ५५३ मधील ३ गुंठे*

**"मान्य"**

**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ८४ वी बैठक दिनांक ०३ जून २०१४

क्षेत्र मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांना खालील अटींचे अधिन राहून भाडेपट्टयाने देण्याबाबतच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

अट-१ : सदर जागा महामंडळाच्या मालकीची असल्याने, त्यावर इतर कोणतेही अतिक्रमण रोखण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांची राहील.

अट-२ : सदर जागेवर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांचा मालकी हक्क राहणार नाही.

अट-३ : सदर जागेकरिता प्रचलित नियमाप्रमाणे आगाऊ भाडे कार्यकारी अभियंता, ताकारी पंपगृह विभाग क्र. १, देवराष्ट्रे यांना देणे बंधनकारक राहील."

*ठराव क्र. ८३/६*

*"ठराव करण्यात येतो की,मौजे सांगणोरे, ता.जुन्नर येथील पिंपळगांव जोगे धरण बुडीत क्षेत्रातील संपादित करावयाच्या जमिनीमध्ये खरीप हंगाम २०११-१२ मध्ये धरणाचे पाणी शिरल्याने संबंधीत शेतकऱ्यांच्या १९.८० हेक्टर क्षेत्रामधील पिकाचे नुकसान झाले असून नुकसान भरपाईची मूल्यांकन रक्कम तालुका कृषी अधिकारी, जुन्नर यांनी प्रमाणित केल्यावरुन रु.३,७१,०१९/- इतकी अदा करण्यास खालील अटीच्या अधीन राहून नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे*

*अट : भूसंपादन कार्यवाहीमध्ये झालेल्या विलंबाबाबत जबाबदारी निश्चित करावी."*

*ठराव क्र. ८३/७*

*"ठराव करण्यात येतो की,पिंपळगांव जोगे डावा कालवा कि.मी.४७ मधील सा.क्र.४६/५०० ते ४६/८०० हा कालव्याचा भाग खोल खोदाईमधून जात असल्यामुळे त्या भागाजवळील मौजे गुळूंचवाडी येथील समाजमंदिर, जिल्हा परिषद शाळा, हनुमान मंदिर व अंगणवाडी या इमारतींचे स्थलांतरण करणे आवश्यक असल्याने अस्तित्वातील या इमारतींची बांधकामांची मूल्यांकन किमंत रु.३०.३२ लक्ष इतकी रक्कम संबंधितांकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."*

*ठराव क्र. ८३/८*

*"ठराव करण्यात येतो की,म्हसवड उजवा कालवा कि.मी.१ ते ८.६० या प्रकल्पावरील झालेला अद्ययावत खर्च रुपये १८.३२ लक्षसह प्रकल्प आहे त्या स्थितीत अंतिम करणेबाबत शासनास शिफारस करण्यास, तसेच या प्रकल्पाचे उर्वरित काम नवीन काम म्हणून प्रशासकीय मान्यतेकरिता शासनाकडे प्रस्तावित करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे"*

**"मान्य"**

**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
# नियामक मंडळाची ८४ वी बैठक दिनांक ०३ जून २०१४

*ठराव क्र. ८३/९*

*"ठराव करण्यात येतो की, इंदापूर शहराच्या घनकचरा व्यवस्थापनासाठी महामंडळाच्या मालकीची मौजे इंदापूर येथील गट क्र. ३४/१/अ/२ मधील १.८५ हे. इतकी विनावापर जागा "सदर जागेची चालू मूल्यांकनाप्रमाणे येणारी किंमत अर्जदार संस्थेकडून महामंडळास मिळाल्यानंतर" जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."*

*ठराव क्र. ८३/१०*

*"ठराव करण्यात येतो की, दि. २९-५-२००२ रोजीच्या पत्रान्वये लवासा कंपनीस महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने ८ बंधारे बांधण्याच्या दिलेल्या मंजुरीमध्ये दर्शविलेल्या ८७१ द.ल.घ.फू. पाणी साठवण क्षमतेमध्ये वाढ न करता मूळ मंजूरीमधील धामणओहोळ येथील बंधारा क्र. ८ रद्द करुन त्याऐवजी मौजे मुगांव बंधारा क्र. ११ हा वरसगांव धरण बुडीत क्षेत्रामध्ये व मुगांव बंधारा क्र.१२ हा वरसगांव धरण पाणलोट क्षेत्रामध्ये बांधावयाचा प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी खालील अटींच्या अधीन राहून सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.*

*अट क्र. १ :* *लवासा कंपनीस महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने दिलेल्या मूळ मंजुरीमध्ये समाविष्ट असणारा मौजे धामणओहोळ ता.मुळशी येथील बंधारा क्र.८ हा त्याजागी वरसगांव उदंचन जलविद्युत प्रकल्पांतर्गत उर्ध्व धरण नियोजित असल्याने रद्द करणेत येईल.*

*अट क्र. २ :* *मुगांव बंधारा क्र.११ व १२ चे बांधकाम लवासा कंपनीस स्वखर्चाने करावे लागेल, परंतु मुगांव बंधारा क्र. ११ मध्ये असणारा वरसगांव जलाशय पूर्ण संचयपातळीपर्यंतचा (६३९.५० मी.) पाणीसाठा (१४२.६१ दलघफू) हा वरसगांव जलाशयाचाच भाग असल्याने धरणाची व त्यामधील पाण्याची मालकी जलसंपदा खात्याची राहील.*

*अट क्र.३ :* *याकरिताच्या शासनाच्या विविध विभागाच्या वैधानिक परवानग्या काम सुरु करण्यापूर्वी घेण्याची जबाबदारी कंपनीची राहील.*

*अट क्र. ४ :* *महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ व लवासा कंपनी यांच्यामध्ये दि.२.९.२००२ रोजी मूळ मंजुरीप्रमाणे बंधारे बांधण्याबाबतच्या करारनाम्यातील सर्व अटी लवासा कंपनीस बंधनकारक राहतील."*

*ठराव क्र. ८३/११*

*"ठराव करण्यात येतो की, मौजे यवत, ता. दौंड, जिल्हा-पुणे येथील जलसंपदा विभागाची गट नं. ४३८ मधील ५ गुंठे विनावापर जागा थिगेवाडी व यादववाडी या ठिकाणी नळपाणी पुरवठा योजनेसाठी "सदर जमिनीची बाजारभावाप्रमाणे होणारी किंमत महामंडळ कार्यालयाकडे जमा केल्यानंतर" जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे कायमस्वरुपी वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे."*

**"मान्य"**

**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ८४ वी बैठक दिनांक ०३ जून २०१४

*ठराव क्र. ८३/१२*

*"ठराव करण्यात येतो की, को. प. बंधारे मिरे, ता. माळशिरस, जि. सोलापूर साठी खाजगी खरेदीने संपादित केलेल्या जमिनीबाबतची प्रत्यक्ष क्षेत्रिय वस्तु:स्थिती जाणून घेण्यासाठी मा. मंत्री व मा. प्रधान सचिव (जसं) यांचे समवेत सर्व संबंधितासमवेत बैठक घेऊन बैठकीत या विषयी होणा-या चर्चेनुसार या प्रकरणी पुढील कार्यवाही करावी अशा सूचना मा. अध्यक्ष यांनी दिल्या. त्यामुळे या विषयाबाबत कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही.*

**ठराव क्र. ८४/३**

**"ठराव करण्यात येतो की, हिवर्डा ल. पा. तलाव, ता. भूम, जि. उस्मानाबाद या लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या धरणाचे काम सन २००७ मध्ये पूर्ण झाल्याने व एकूण ७.२० कि.मी. लांबीच्या उजव्या कालव्यापैकी कि.मी. ५ च्या पुढील कालव्यासाठी भूसंपादनास शेतकऱ्यांचा विरोध असल्याने या योजनेच्या उजवा कालवा किमी. ५ पुढील कालव्याचे काम रद्द करणेबाबत नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

**ठराव क्र. ८४/४**

**"ठराव करण्यात येतो की, निम्नखैरी बृहत ल. पा., ता. परांडा, जि. उस्मानाबाद या लघु पाटबंधारे योजनेच्या धरणाचे काम पूर्ण असल्याने व नियोजित १५.२० कि.मी. लांबीच्या कालव्यास शेतकऱ्यांचा भूसंपादनास विरोध असल्याने व कालव्या ऐवजी धरणाचे पाणी नदीवरील अस्तीत्वातील ६ बंधाऱ्यात सिंचनासाठी सोडण्याची मागणी असल्याने प्रकल्पाच्या नियोजित कालव्याचे काम रद्द करणेबाबत नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

**ठराव क्र. ८४/५**

**""ठराव करण्यात येतो की, महामंडळाचे ताब्यातील शेटफळ हवेली ता.इंदापूर तलावासाठी मौजे शेटफळ हवेली येथील ग.नं.१२४/२ मधील २ आर संपादीत जागेची चालू मुल्यांकनानुसार होणारी किंमत अर्जदार संस्थेकडून महामंडळास मिळण्याच्या अटीवर जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे वर्ग करुन त्यांचेमार्फत ही जमीन ग्रामपंचायत वडापूरी, ता. इंदापूर या ग्रामपंचायतीस सार्वजनिक नळपाणी पुरवठा योजना विहीर खोदाईसाठी देणेबाबत नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे"**

**ठराव क्र. ८४/६**

**"ठराव करण्यात येतो की, मेरी टाईम एनर्जी हेली एअर सर्विसेस प्रा. लि. मुंबई या संस्थेस पवना जलाशयामध्ये विमान उतरविण्यास व मुंबई ते पवना धरण अशी जलविमान वाहतूक**

**"मान्य"**

**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११**
**नियामक मंडळाची ८४ वी बैठक दिनांक ०३ जून २०१४**

करण्यास ना हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबतच्या प्रस्तावास खालील अटींच्या अधिन राहून नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

(१) महामंडळांतर्गत धोम धरणावर जल विमानसेवा सुरु करण्यबाबत संस्थेने कार्यकारी अभियंता, धोम पाटबंधारे विभाग, सातारा व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचेबरोबर दि. २२-०३-२०१४ रोजी त्रिपक्षीय करार केलेला आहे. त्यातील अटी व शर्तीनुसार तसेच याबाबत शासनाने वेळोवेळी सुचीत केलेल्या सर्व अटींनुसार संस्थेस पवना धरणावर सदरची सेवा चालू करण्यास ना हरकत देण्यात यावे. करारनामा करतांना शासनाच्या धोरणाशी सुसंगत अटींचा समावेश होईल याबाबत दक्षता घ्यावी.

(२) मेरी टाईम एनर्जी हेली एअर सर्व्हिसेस यांनी धोम जलाशयाकरिता कार्यकारी अभियंता, धोम धरण विभाग, सातारा यांचेशी करारनामा करताना रु. २५ लक्ष सुरक्षा अनामत रक्कम अदा केलेली आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व मेरी टाईम एनर्जी हेली एअर सर्व्हिसेस यांचेमधील करार अस्तीत्वात असेपर्यंत संस्थेने धोम जलायाकरीता अदा केलेली ही सुरक्षा अनामत रक्कम महामंडळांतर्गत विविध जलाशयाकरिता या संस्थेस परवानगी देतांना ग्राह्य धरण्यात यावी."

ठराव क्र. ८४/७

"ठराव करण्यात येतो की, मे.चोखरा ॲन्ड गांधी, सनदी लेखापाल, मुंबई यांचा अनुभव व कामातील निपुणता लक्षात घेता त्यांची आर्थिक वर्ष सन २०१४-१५ व सन २०१५-१६ करिता महामंडळाचे अंतर्गत लेखा परीक्षणाचे व इतर कामासाठी रु. १८.३१ लक्ष प्रतीवर्ष अधिक सेवाकर यादराने नियुक्ती करण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ८४/८

"ठराव करण्यात येतो की, भामा आसखेड प्रकल्पाच्या नियोजित लाभक्षेत्रामध्ये वेगाने होणारे नागरीकरण व त्यामुळे वाढलेल्या बिगर सिंचन पाणी वापराच्या मागण्या तसेच लाभक्षेत्रातून जमीनी वगळण्याच्या शेतकरी, ग्रामपंचायती व लोकप्रतिनिधींच्या मागण्या विचारात घेऊन खेड तालुक्यातील उजव्या कालव्याच्या कि.मी. २० ते ३० मध्ये येणाऱ्या ग्रामपंचायत गोनवडी, बिरदवाडी, खराबवाडी यांच्या दिलेल्या निवेदनानुसार मौजे गोनवडी (१५५.९२ हे.), मौजे बिरदवाड ( ३५.९९ हे.), मौजे खराबवाडी ( १०.८९ हे.) गावाचे एकूण २०२.८० हे. लाभक्षेत्र वगळण्याचा प्रस्ताव खालील तपशीलासह महसूल विभागामार्फत शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

(१) भामा आसखेड प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातून उपरोक्त गावांचे क्षेत्र वगळण्याबाबत ग्रामसभेचे ठराव ग्रामपंचायतीने सादर केल्यामुळे या क्षेत्रास भामा आसखेड प्रकल्पाच्या पाण्यावर कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही.

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

(२) सदरचा प्रस्ताव मान्य झाल्यास भामा आसखेड प्रकल्पाचे प्रकल्पीय सिंचन क्षेत्र ४०४३.२५ हे. इतके सिमीत होईल व त्यासाठी उजवा कालवा कि.मी.१ ते ६१ नियोजित राहील.

(३) प्रस्तावित वगळावयाच्या गावातील क्षेत्रामधील जे क्षेत्र पुनर्वसनासाठी वाटप झालेले आहे. त्याबाबत फेरविचार करावा लागेल.

(४) प्रकल्पाच्या नियोजित लाभक्षेत्राचे बहुतांशी पाणी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला पिण्यासाठी वळविलेले आहे. त्यामुळे भामा आसखेड प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी या दोन्ही महानगरपालिकांनी सहकार्य करावे किंवा शासनाच्या माध्यमातून विशेष पॅकेज देण्यात यावे."

ठराव क्र. ८४/९

"ठराव करण्यात येतो की, कण्हेर प्रकल्पांतर्गत मौजे वेळे (वेणेगांव) ता. जि. सातारा येथील पुनर्वसित गावठाणात वाटप केलेल्या भूखंडावर श्री. पांडुरंग श्रीरंग शिंदे व श्री. शिवाजी श्रीपती जाधव यांनी घरे बांधल्यानंतर, भूखंडाखालील जमीन संपादनामधून वगळल्याने त्या घरांची नुकसान भरपाई देण्याबाबतचा विषय भुखंड वाटप केलेले क्षेत्र संपादनामधून वगळावयाच्या कारणमिमांसेसह पुढील बैठकीत ठेवावा व त्यावेळेस जिल्हा पुनर्वसन अधिकारी, सातारा यांनी उपस्थित रहावे असे ठरल्याने याबाबत कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही."

ठराव क्र. ८४/१०

"ठराव करण्यात येतो की, टेंभू उपसा सिंचन प्रकल्प, ता. कराड, जि. सातारा अंतर्गत सांगोला कालवा कि. मी. ३, ८, १७ मधील कालवा कामाच्या निविदेअंतर्गत बांधकामाच्या बाबींना चालू दरसूची देण्यासाठी निविदा शर्तीमध्ये विचलन करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे विचलनास मंजूरी देण्यासाठी शासन पत्र दिनांक ४/५/२०१३ चा विचार करता नियामक मंडळ हे सक्षम आर्थिक प्राधिकरण नसल्याने सदर प्रकरण शासनस्तरावर निर्णयार्थ फेर सादर करावे."

आयत्या वेळेचे विषय

ठराव क्र. ८४/११

"ठराव करणेत येतो कि, सातारा जिल्ह्यातील प्रकल्पांतर्गत मंजूर पाणीवापराचा आढावा घेऊन त्यामधून पाणी उपलब्ध होत असल्यास किंवा दुसऱ्या कृष्णा पाणी तंटा लवादनुसार राज्यास अतिरिक्त पाणी उपलब्ध झाल्यास वांगणा उपसा सिंचन योजना, ता. कोरेगांव या योजनेच्या लाभक्षेत्रातून वंचित राहिलेल्या गावांना पाणी देणेच्या दृष्टीने (अ) भाडळे खो-यातील हिवरे तलावात पाणी सोडणे व हिवरे तलावातून उपसा सिंचन योजनेव्दारे मौजे भाडळे, बोधेवाडी व नागेवाडी गावास ३५० हे. क्षेत्रास पाणी देणे, (ब) मौजे सिद्धार्थनगरचे ४१० हे. वंचित क्षेत्रास

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ८४ वी बैठक दिनांक ०३ जून २०१४

पाणी देणे व (क) मौजे अनभुलवाडी व मौजे बोरजाईवाडीच्या तलावात पाणी सोडणे यासाठी एकूण ०.३० अघफू जादा पाणी वांगणा उपसा सिंचन योजनेसाठी प्राथम्याने उपलब्ध करुन देण्यासाठी नियामक मंडळाची तत्वत: मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ८४/१२**

"ठराव करणेत येतो कि, सातारा जिल्ह्यातील प्रकल्पांतर्गत मंजूर पाणीवापराचा आढावा घेऊन त्यामधून पाणी उपलब्ध होत असल्यास किंवा दुसऱ्या कृष्णा पाणी तंटा लवादनुसार राज्यास अतिरिक्त पाणी उपलब्ध झाल्यास वसना उपसा सिंचन योजना, ता. कोरेगाव मधून अरबवाडी लघु पाटबंधारे तलावात पाणी सोडण्यासाठी ०.०६ अघफू जादा पाणी वसना उपसा सिंचन योजनेसाठी प्राथम्याने उपलब्ध करुन देण्यासाठी नियामक मंडळाची तत्वत: मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ८४/१३**

"ठराव करणेत येतो कि, सातारा जिल्ह्यातील प्रकल्पांतर्गत मंजूर पाणीवापराचा आढावा घेऊन त्यामधून पाणी उपलब्ध होत असल्यास किंवा दुसऱ्या कृष्णा पाणी तंटा लवादनुसार राज्यास अतिरिक्त पाणी उपलब्ध झाल्यास जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेअंतर्गत खटाव तालुक्यातील मुळ मंजुर योजनेत अंर्तभुत नसलेल्या नेर तलावाच्या वरील काळेवाडी, पांढरवाडी, जळकेमळा, रणसिंगवाडी, डिस्कळ, गांधीनगर, रामोशीवाडी या ७ गावातील सुमारे १०३० हेक्टर वाढीव क्षेत्रासाठी ०.१६५ अघफू पाणी प्राथम्याने उपलब्ध करुन देण्यासाठी नियामक मंडळाची तत्वत: मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ८४/१४**

"ठराव करण्यांत येतो की, महामंडळाच्या मालकीच्या कृष्णानगर वसाहत, सातारा येथील ९ x १८ मी. (१६२ चौ. मी. ) मोकळी जागा तसेच वसाहतीमध्ये विनावापरात असलेल्या २ खोल्या (एकूण क्षेत्रफळ ३३.९० चौ. मी.) भारत मौसम विज्ञान विभाग (पृथ्वी विज्ञान मंत्रालय, भारत सरकार) यांना महामंडळाचे प्रचलित दरानुसार भाडेपट्टयाने देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे."

तद्नंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

"मान्य"

(इंजि. शि. मा. उपासे)
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

(मा. ना. श्री. शशिकांत शिंदे)
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे